## जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
## तलाठी पदाची सरळ सेवा भरती प्रक्रिया - २०११
## (अल्प मुदत दर पत्रक सुचना)

जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथील गट-क संवर्गातील तलाठयांची रिक्त असलेली पदे जाहीरातीद्वारे भरण्यांत येत असून भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासंबंधाने माहिती तंत्रज्ञान सेवा पुरविणाऱ्या मान्यता प्राप्त अनुभवी संस्थातर्फे खाली नमुद केलेल्या कामासाठी टप्पेनिहाय कामाकरीता मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

परिपूर्ण निविदा दिनांक २० जून, २०११ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व त्याचदिवशी सायंकाळी ५.०० वाजता उपस्थित कंत्राटदारासमोर अथवा त्यांचे प्रतिनिधीसमोर उघडण्यात येवून त्यानंतर लगेच निविदा मंजूर झाल्याचे कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | टप्पानिहाय काम पूर्ण करावयाचा दिनांक |
|---|---|---|
| १ | पोस्टातून/कार्यालयात प्राप्त झालेले अर्ज स्विंकारुन नोंदवही मध्ये नोंदी घेणे व विहित नमुन्याप्रमाणे यादी तयार करणे. | **टप्पा क्र. १ दिनांक ९ जुलै, २०११** |
| २ | प्राप्त अर्जाची नोंदी घेवून तपासणी सुची प्रमाणे पात्र/अपात्र अर्जाची छाननी करुन आडनावानुसार यादी तयार करणे. | **दिनांक ११ जुलै, २०११** |
| ३ | पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तयार करुन मान्यतेनंतर या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणे. | **टप्पा क्र. २ दिनांक १२ जुलै, २०११** |
| ४ | लेखी परीक्षेकरीता पात्र उमेदवारांचे छायाचित्र प्रवेशपत्रावर Scan करुन प्रवेशपत्र तयार करणे व निर्गमित करणे. | **दिनांक १३ जुलै, २०११** |
| ५ | परीक्षाकेंद्र निहाय पात्र उमेदवारांची अर्जावरील छायाचित्र व त्याची स्वाक्षरी Scan करुन हजेरीपट तयार करणे. | **दिनांक १३ जुलै, २०११** |
| ६ | लेखी परीक्षेकरीता नमुना उत्तरपत्रिका (१०० Gsm कागदावर) तयार करुन देणे व नमुना उत्तरपत्रिकेस कार्यालयाची मान्यता घेवून उत्तरपत्रिकांची छपाई करुन देणे. | **टप्पा क्र. ३ दिनांक १५ जुलै, २०११** |
| ७ | लेखी परीक्षा झाल्यानंतर त्याचदिवशी उत्तरपत्रिकांची संगणकाद्वारे स्कॅनिंग व ऑटोमॅटीक (OMR) पध्दतीने तपासणी करुन उमेदवारांची प्रवर्गनिहाय प्राप्त गुणांची यादी तयार करुन देणे. तात्पुरती निवड व प्रतिक्षा सुची तयार करणे. | **टप्पा क्र. ४ दिनांक ३१ जुलै, २०११** |

| | | |
|---|---|---|
| ८ | गरजेनुसार प्रिंटआऊट काढून देणे, प्रवर्गनिहाय अंतिम निवड यादी तयार करुन देणे व याचा सर्व डाटा डीव्हीडी वर कॉपी करुन देणे आणि अंतिम निवड व प्रतिक्षा सुचीवर निवड झालेल्या उमेदवारांचे अर्ज स्कॅन करुन त्याची डीव्हीडी तयार करुन देणे. निवड प्रक्रियेतील आवश्यक ती माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे. | **टप्पा क्र. ४**<br>**दिनांक ३१ जुलै, २०११** |

दरपत्रकामध्ये काम निहाय दर नमूद करणे आवश्यक राहील. आवश्यकतेप्रमाणे मंजूर कामामध्ये वाढ घट असल्यास त्याबाबत सेवा पुरवठा संस्थेला कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

दरपत्रके मंजूर झाल्यानंतर त्याचदिवशी करारपत्र करुन घ्यावे लागेल व लगेच दिनांक २१ जून, २०११ पासून मंजूर दरपत्रकाप्रमाणे दिलेले काम सुरु करावे लागेल.

जिल्हाधिकारी
तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती,
नागपूर,करिता.

क्र.आस्था/कार्या-३/अ-१०/कावि-     /२०११
जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालय,
नागपूर दिनांक  १३ जून, २०११

प्रतिलीपी :- अधिक्षक, जि.का.नागपूर यांनी सदर सुचना जिल्हाधिकारी कार्यालयाचे सुचना फलकावर लावून प्रसिध्द करावी व तसा अहवाल सादर करावा.